**आर.डी. नं. ०२/२२**
विठ्ठल एलजी पाटील
वि.
शेख करीम शेख उखर्डू मोमिन

## आदेश नि.क्र.२५ खाली.

धनको यांनी सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश २१ नियम ३४ नुसार दाखल केला असुन दस्तऐवजाचे निष्पादन करण्यासाठी व कोर्ट कमिशरची नियुक्तीसाठी दिला आहे.

## धनकोचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे आहे.

२. जि. जळगांव ता. धरणगांव पैकी मौजे बांभोरी येथील गट नं. ५३० एकुण क्षेत्र १हे. ६३आर. या मिळकती विषयी शे. करीम शे. उखर्डू मयत यांचे वारस ऋणको नं. १ ते १२ यांनी दिवाणी न्यायाधीश क.स्तर धरणगांव यांच्या न्यायालयामध्ये विठ्ठल एलजी पाटील मयत यांचे वारसां विरुध्द निरंतर मनाई हुकूमासाठी रे.मु.नं. ८२/०८ (जुना दिवाणी दावा नं. ४३/०१) हा दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये विठ्ठल एलजी पाटील मयत यांचे वारसाकडून प्रति दावा दाखल करुन सौदे पावती प्रमाणे खरेदीखत नोंदवुन मिळावे अशी मागणी केली होती. सदर दावा हा न्यायालयाने रद्द केला असुन धनकोचा प्रतिदावा मंजुर करुन खरेदीखत नोंदवुन देण्याचा आदेश केला आहे. सदर न्यायनिर्णयाच्या विरुध्द ऋणको यांनी नियमित दिवाणी अपील ७१/१३ दाखल केले होते आणि सदर अपील मा. जिल्हा न्यायाधीश, जळगांव यांनी रद्द केले असुन त्यामध्ये सुध्दा सौदे पावती नुसार खरेदीखत नोंदवुन देण्याचा आदेश व हुकूमनामा पारीत करण्यात आला आहे. धनकोचे पुढे असेही म्हणणे आहे की, सदर हुकूमनाम्या प्रमाणे सौदेपावती वरुन ऋणको हे खरेदीखत नोंदवुन देत नसल्यामुळे धनको यांनी खरेदीखताचा मसुदा दाखल केला आहे व खरेदीखताचा दस्त निष्पादीत करण्यासाठी न्यायालयाचे नाझर यांची नियुक्ती करण्यासाठी सदर अर्ज दाखल करणे भाग झाले आहे. धनको यांनी सौदे पावती नुसार मिळकतीची संपूर्ण रक्कम दिली

असुन कराराची संपूर्ण पुर्तता केली आहे. तसेच मिळकतीवर ताबा देखील धनको यांचाच असुन धनको हे कोर्ट कमिशनर कामी येणारा संपूर्ण खर्च करण्यास तयार आहे. त्यामुळे सौदे पावतीनुसार व खरेदीखताचा दस्त निष्पादीत करण्यासाठी न्यायालयाचे नाझर यांची नियुक्ती करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**ऋणको यांचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे आहे.**

३. सदर अर्जास ऋणको नं. १ ते ३ यांनी हरकत नोंदवुन नि.क्र.३१ वर खुलासा सादर करुन विरोध केला असुन थोडक्यात असे कथन केले आहे की, त्यांनी आर.सी.एस. नं. ८२/०८ मध्ये पारीत झालेल्या निकालाविरुध्द मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे अपील दाखल केले असुन दरखास्तीनुसार आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगितीची मागणी केली आहे. दरखास्त मध्ये नमुद ऋणको यांच्या मालकीची मौजे बा. भोरी प्र.चा. शिवारातील वादग्रस्त मिळकत शेत गट क्र. ५३० क्षेत्र १हे. ५०आर. ही मिळकत अंजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत असुन ऋणको यांची त्याच शिवारात दुसरी मिळकत गट नं. ५११ क्षेत्र ३हे. ९४आर. ही मिळकत देखील अंजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येते. ऋणकोचे वडील शे. करीम शे. उर्खडू मोमिन यांनी दि. १०.११.१९९७ रोजी वादग्रस्त मिळकत विक्री करण्याची परवागनी मिळण्यासाठी अर्ज जिल्हाधिकारी जळगांव यांच्याकडे केला होता परंतु त्यामध्ये जिल्हाधिकारी जळगांव यांनी ऋणको यांच्या वडीलांना सदर मिळकत विक्री करण्या बाबत अटी शर्तीसह परवानगी देण्यास मान्य केले. जिल्हाधिकारी यांनी लादलेल्या अटी अशा होत्या की, 'शासनास आवश्यक वाटल्यास जमिनी विकत देणार यांच्याकडून परवानगी तारखेच्या पुर्वी किंवा नंतर असणा–या खात्यावरील अंजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील मौजा बांभोरी बु., ता. एरंडोल, जि. जळगांव येथील गट नं. ५११ क्षेत्र ३हे. ९४आर. यापैकी जमिन १हे. २१आर. आरक्षीत ठेवुन शासनास बिनतक्रार संपादण्यास दयावी लागेल.' परंतु सदर अट ही ऋणको यांना मान्य नसुन त्यांनी दि. २७.०१.२०२२ रोजी जिल्हाधिकारी यांना दि.२०.१२.१९९७ रोजीच्या आदेशातील अटी व शर्ती रद्द होण्यासाठी अर्ज केला परंतु जिल्हाधिकारी यांनी अद्याप त्यामध्ये कोणताही निर्णय घेतला नसुन सदर मिळकत

विक्री करण्यास अद्याप विना अटी व शर्तीची परवानगी दिली नाही म्हणून सदरची मिळकत विक्री करण्याच्या परवानगीसाठी कायदेशीर बाधा असल्यामुळे ऋणकोला सदरची मिळकत धनकोला विक्री करण्यास अडचण निर्माण झाली आहे परंतु ऋणको हे रे.मु.नं. ८२/२००८ मध्ये पारित झालेलया आदेशाप्रमाणे खरेदीची रक्कम रु. ४०,०००/— १८ टक्के व्याजासह धनकोस परत करण्यास तयार आहेत. वादग्रस्त शेत मिळकत विक्री करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून परवानगी प्राप्त झाल्याशिवाय खरेदी करता येवू शकत नाही आणि त्याप्रमाणे कायदेशीर परवानगी नसल्यामुळे दस्तऐवजाचे निष्पादन करणे व त्यासाठी कोर्ट कमिशनरची नियुक्ती करणे बेकायदेशीर होईल त्यामुळे त्यांनी सदर अर्ज नि.क्र.२५ नामंजुर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही पक्षांचे ऐकले. धनको यांचे विद्वान विधीज्ञ यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे युक्तीवाद करुन ऋणको यांना मा. जिल्हाधिकारी यांनी दावा मिळकत विकण्याची परवानगी दिली असल्याने ऋणको यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत धनको यांच्या लाभात नोंदवुन दयावे अशी विनंती केली. या उलट ऋणको यांचे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेली परवानगी ही अटी शर्तीवर असुन सदर अटी ऋणकोला मान्य नसल्याने त्यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सदर परवानगी रद्द करण्या करीता अर्ज सादर केला आहे. पुढे त्यांनी असाही युक्तीवाद केला की, सदर परवानगी ही बेकायदेशीर असल्याने धनको यांचा सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. मी दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला तसेच अभिलेखाची पाहणी केली. सदर दरखास्तमध्ये धनको यांनी दावा मिळकत न्यायालया मार्फत सक्षम अधिकारी यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करुन ऋणको यांना धनको यांच्या लाभात दि. ०२.०२. १९९३ रोजीच्या सौदे पावती नुसार नोंदणीकृत खरेदीखत करुन मिळण्या करीता तसेच रक्कम रु. ३०५०/— ही वादी कडून वसुल होवुन मिळण्या करीता आणि न्यायालया मार्फत सक्षम अधिकारी यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करुन सदरच्या खरेदीकरीता लागणारे महाराष्ट्र प्रकल्प विस्थापित व्यक्ती पुर्नवसन अधिनियम, १९७६

प्रमाणेचे व इतर परवाने हे ऋणको यांच्याकडून घेवुन मिळण्या करीता दाखल केला आहे.

६. सदर अर्ज दाखल करुन धनको यांचे असे म्हणणे आहे की, ऋणको यांनी आरसीएस नं. ८२/२००८ व आरसीए नं. ७१/१३ यामध्ये पारित झालेल्या हुकूमनाम्या नुसार ऋणको यांना वाद मिळकतीचे खरेदीखत त्यांच्या नांवे करुन दयावे व त्या करीता कोर्ट कमिशनर म्हणून न्यायालयाचे नाझर यांची नियुक्ती करण्यात यावी अशी विनंती धनको यांनी केली आहे. येथे मी नमुद करु इच्छितो की, हे प्रस्थापित तत्व आहे की, अंमलबजावणी न्यायालय हुकूमनाम्याची अंमलबजावणी करतांना हुकूमनाम्याच्या पलिकडे जावु शकत नाही. या अनुषंगाने ऋणको यांनी न्यायालयात दाखल केलेल्या आरसीए नं. ७१/१३ मधील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये मा. अपिल न्यायालय, जळगांव यांनी असे नमुद केले आहे की, ऋणको यांनी संबंधीत विभागाची परवानगी घ्यावी व यात ऋणको चुकल्यास धनको यांनी त्या करीता न्यायालया मार्फत कोर्ट कमिशनरची नेमणुक करुन कोर्ट कमिशनरद्वारे संबंधीत विभागाकडून परवानगी ऋणको यांच्याकडून घेण्यात यावी. परंतु धनको यांनी या अनुषंगाने कोणतीही पाउले आरसीए नं. ७१/१३ मध्ये पारित झालेल्या न्यायनिर्णयाप्रमाणे उचलले असल्याचे दिसुन येत नाही. धनको यांनी सदर प्रकरणात नियमीत दिवाणी दावा ८२/०८ व आरसीए नं. ७१/१३ यामध्ये पारित झालेल्या न्यायनिर्णयाच्या प्रती दाखल केल्या आहेत. परंतु दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश २१ नियम ११ (३) प्रमाणे धनको यांनी आरसीए नं. ७१/१३ व रे.मु.नं. ८२/२००८ या मधील हुकूमनाम्याच्या प्रती दाखल केल्या नाहीत.

७. येथे विचारात घेण्याजोगी बाब म्हणजे धनको यांनी त्यांच्या या अर्जाच्या समर्थनार्थ मा. जिल्हाधिकारी यांनी दि. २०.१२.१९९७ रोजी पारित केलेला वाद मिळकत विक्री परवानगीचा आदेश दाखल केला आहे. परंतु सदर आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की त्यामध्ये अटी शर्तीच्या अधिन राहून मा. जिल्हाधिकारी यांनी परवागनी दिली आहे. सदर आदेशाच्या महत्वाच्या बाबी येथे मी

खालील प्रमाणे नमुद करीत आहे.

८. वरील बाबींवरुन अर्जदाराची विनंती योग्य असल्याची खात्री झाल्याने मी जिल्हाधिकारी, जळगांव शासनाकडील आदेश क्र. आरपीए/१०८९/सीआर/९४/ र–१, दि. १२.०७.९१ मध्ये नमुद केलेल्या खालील शर्तीवर उपरोक्त जमिन विक्रीची परवानगी देत आहे.

१. शासनास आवश्यक वाटल्यास जमिन विकणारे यांच्याकडे परवानगीच्या तारखेपुर्वी किंवा नंतर असणा–या खात्यावरील अंजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रावरील मौजे बांभोरी, ता.एरंडोल, जि.जळगांव येथील गट क्र. ५११ क्षेत्र ३हे. ९४आर. पैकी जमिन १हे. २१आर. आरक्षित ठेवुन शासनास बिनतक्रार संपादनास दयावी लागेल.

२. सदर परवानगीचे लगत तारखेपुर्वी त्यांच्या खात्यावर जी एकुण जमिन असेल ती लक्षात घेता जी जमिन अतिरिक्त म्हणून घेण्यास पात्र राहील तेवढीच महाराष्ट्र प्रकल्प विस्थापितांचे पुर्नवसन कायदा, १९६८ मध्ये कलम १४ प्रमाणे संपादन करण्यास शासनास बाधा येणार नाही.

३. सदरचा व्यवहार करण्यापुर्वी अन्य प्रचलित कायदयातील तरतुदी प्रमाणे जी जी परवानगी घेणे आवश्यक असेल ती ती घेण्याची जबाबदारी अर्जदार श्री. शेख करीम शेख उखर्डू मोमिन, रा. बांभोरी बु., ता.धरणगांव, जि.जळगांव यांची राहील. त्यांनी संबंधीत अधिकारी यांच्याकडून घेतली पाहीजे. त्या शिवाय केलेला व्यवहार बेकायदेशीर ठरेल व रद्दबातल ठरेल.

४. सदर परवानगी आदेशातील शर्तीचा भंग झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल व नियमा नुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

९. या आदेशाचे अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, ऋणको शेख करीम शेख उखर्डू मोमिन यांनी वाद मिळकत विक्रीची परवानगी मिळण्या बाबत केलेल्या अर्जानुसार त्यावर दि. २०.१२.१९९७ रोजी सदर आदेश मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांनी पारित केलेला आहे. येथे विचारात घेण्याजोगी बाब म्हणजे सदर आदेश

हा दि. २०.१२.१९९७ रोजी पारित झालेला असतांना धनको किंवा ऋणको यांनी सदर आदेश रे.मु.नं. ८२/०८ प्रलंबित असतांना व त्या नंतर आर.सी.ए. नं. ७१/१३ प्रलंबित असतांना न्यायालयाच्या निर्देशनास आणुन दिला होता किंवा काय या बाबत कोणताही उहापोह धनको यांनी सदर दरखास्तीमध्ये व या अर्जामध्ये केलेला दिसुन येत नाही. सदर आदेश हा रे.मु.नं. ८२/०८ व आर.सी.ए. नं. ७१/१३ प्रलंबित असतांना न्यायालयाच्या निर्देशनास आणुन दिला असता तर निश्चीतच या आदेशावर संबंधीत न्यायालयांनी उहापोह करुन सदरच्या आदेशाद्वारे जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिलेली परवानगी ही कायेदशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे या बाबत निश्चीतच गुण दोषावर निर्णय पारित केला असता. रे.मु.नं. ८२/०८ मधील निकालामध्ये पॉईंट नं. ७ व आरसीए ७१/१३ च्या निकालामधील पॉईंट नं. ई अंतिम आदेशात न्यायालयांनी नमुद केले असुन त्याद्वारे धनको व ऋणको यांना न्यायालयाने संबंधीत विभागाची परवानगी घेण्याचे निर्देशीत केले आहे. धनको यांनी मा. जिल्हाधिकारी यांचा दि. २०.१२.१९९७ रोजीचा आदेश हा माझ्या मते या अंमलबजावणी दरखास्तीमध्ये पहिल्यांदाच दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये माझ्या मते धनको यांना मा. जिल्हाधिकारी यांच्या दि. २०.१२.१९९७ रोजीच्या आदेशाचा लाभ या दरखास्तमध्ये घेता येणार नाही.

१०. येथे मी असेही नमुद करु इच्छितो की, युक्तीवादाचा भाग म्हणून मा. जिल्हाधिकारी यांच्या दि. २०.१२.१९९७ रोजीच्या आदेश विचारात जरी घेतला तरी सदर आदेशामधील नमुद अटी शर्तीची पुर्तता ऋणको यांनी केली आहे काय या बाबत धनको यांनी कोणताही खुलासा अभिलेखावर सादर केला नाही. त्यामुळे सदर आदेशातील अटींची पुर्तता झाली किंवा काय या बाबत निष्कर्ष काढता येवू शकत नाही. एवढेच नव्हे तर ऋणको यांनी परवानगी आदेशातील शर्ती पुर्ण केल्या किंवा काय हे दाखविण्यासाठी धनको यांनी कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले नाहीत. त्यामुळे आरसीए नं. ७१/१३ मध्ये पारित झालेल्या न्यायनिर्णयातील पॉईंट ई प्रमाणे धनको यांनी पुर्तता करणे गरजेचे असल्याचे दिसुन येते. परंतु मी या अगोदरच नमुद केल्याप्रमाणे त्या संबंधी कोणतीही पाऊले धनको यांनी घेतली असल्याचे

दिसुन येत नाही. अशा परिस्थितीमध्ये हुकूमनाम्यानुसार खरेदीखत दस्त निष्पादीत करण्यासाठी न्यायालयाचे नाझर यांची नियुक्ती धनको यांनी या अर्जात केलेल्या विनंती नुसार करता येणार नाही. त्यामुळे माझ्या मते सदर अर्ज हा नामंजुर होण्यास पात्र आहे परंतु असे जरी असले तरी धनको यांना संबंधीत विभागाची परवागनी मिळाल्यानंतर त्यांना पुन्हा अशा प्रकारचा अर्ज करता येण्याची मुभा ठेवुन सदर अर्ज नामंजुर करणे योग्य होईल. करीता खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि.क्र.२५ नामंजुर करण्यात येत आहे.

२. संबंधीत विभागाची परवानगी मिळाल्या नंतर धनको यांना अशा प्रकारचा अर्ज करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३. धनको यांना आदेशाति करण्यात येते की, त्यांनी आर.सी.ए. क्र. ७१/२०१३ मध्ये पारित झालेला हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल करावी.

दि. ३०.०३.२०२४.

(अ.आ.ढोके)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
धरणगांव.